# दलित साहित्य : प्रेरणा आणि स्वरूप

मराठीत दलित साहित्याची चळवळ सुरू होऊन पंचवीस वर्षे होऊन गेली. १९६० नंतरच्या काळातील मराठी साहित्यातील हा लक्षणीय प्रवाह मानला जातो. या काळात मार्क्सवादी विचारप्रणालीतून जीवनवादाचा अन्वयार्थ लावला जाऊ लागला होता. जीवनाकडे अकरणात्मक दृष्टिकोणातून पाहणारा अस्तित्ववाद साहित्यावर प्रभाव टाकीत होता. याच सुमारास दलित साहित्याने आपल्या ज्वलंत उद्रेकाने साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले.

पिढ्यानूपिढ्या ज्यांचे आर्थिक, सामाजिक व मानसिक शोषण झालेले होते, तो दलित वर्ग देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जागृत झाला. शिक्षणामुळे जीवनवास्तवाकडे पाहण्याची नवी दृष्टी त्याला प्राप्त झाली. दलित साहित्यनिर्मितीला त्यातील आशयस्फोटकतेमुळे जसे वेगळेपण आहे तसेच सामाजिक दृष्ट्याही मूल्य प्राप्त झालेले आहे. दलितांचा लढा सत्त्व व स्वत्व यांसाठी होता. सामाजिक अभिसरणप्रक्रियेला त्यामुळे गती आली. अन्यायाच्या विरुद्ध समर्थपणे, संघटितपणे उभे राहण्याचे नव्या काळाचे आव्हान दलितांनी स्वीकारले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित समाजाला स्वाभिमान, स्वावलंबन आणि आत्मोद्धार ही तत्त्वत्रयी दिली. अस्मितेचे नवे भान दिले. त्यातून दलित साहित्याने प्रेरणा घेतली. "१९६० नंतरच्या मराठी साहित्यातील जीवनवाद अधिक भक्कम करण्याचे ध्येय दलित साहित्याचेच आहे." असे डॉ. सदा कऱ्हाडे म्हणतात ते खरेच आहे.

'दलित' या शब्दाची व्याख्या करताना बाबुराव बागूल म्हणतात, 'दलित म्हणजे वर्णव्यवस्थेला आणि तिच्या समग्र वैचारिक व्यवस्थेला उद्ध्वस्त करू बघणारा, दलित म्हणजे हे जग व जीवन नव्याने मांडू बघणारा, दलित म्हणजे हे जग व जीवन नव्याने मांडू बघणारा, दलित म्हणजे या युगाने ज्याचे हात प्रज्ञावंत प्रलयकारी केलेले आहेत आणि ज्यांच्यासाठी आधुनिक शस्त्रे आणि 'शास्त्रे' उपलब्ध करून दिलेली आहेत." यात अमेरिकेतील काळा, गोरा, तांबडा, आफ्रो-आशियाई देशातील काळा, गोरा, पिवळा येतात. प्रा. केशव मेश्राम म्हणतात, "हजारो वर्षे ज्यांच्यावर अन्याय झाला अशा लोकांना दलित म्हटले पाहिजे व त्याच वर्गातील लेखकांनी निर्माण केलेल्या साहित्यास दलित साहित्य

म्हणावे.''

'दलित' साहित्याविषयीची मतमतांतरे पाहता असे दिसून येते की, दलित साहित्याकडे विचारवंतांनी, साहित्यिकांनी स्वागतशील दृष्टीने पाहिले आहे. दलित वर्गातील लेखकांनी व विचारवंतांनीही आपल्या लेखननिर्मितीमागची वैचारिक भूमिका स्वच्छपणे वेळोवेळी मांडलेली आहे. मराठी साहित्याच्या अखंड प्रवाहात दलित साहित्याला सामावून घेण्यात आलेले आहे. प्राचार्य म. भि. चिटणीस, डॉ. म. ना. वानखेडे, शंकरराव खरात, बाबुराव बागूल, डॉ. वसंत मून, प्रा. रावसाहेब कसबे, प्रा. यशवंत मनोहर, प्रा. केशव मेश्राम तसेच प्रा. गं. बा. सरदार, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, डॉ. भालचंद्र फडके, डॉ. गंगाधर पानतावणे, प्रा. रा. ग. जाधव आणि डॉ. सदा कऱ्हाडे यांच्या विचारांचा मागोवा घेतला असता त्यांनी दलित संवेदनशीलता जाणून घेतलेली आहे असे दिसून येते.

दलित साहित्यामुळे सहानुभूतीचा काळ मागे पडून अनुभूतीचे नवे पर्व उजाडले. जिवंत, रसरशीत जीवनानुभव साहित्यातून व्यक्त व्हायला लागले. निकष ठरवून साहित्यनिर्मिती होत नाही. आंतरिक व्यथावेदनांची ऊर्मी अपरिहार्यपणे वेगवेगळ्या प्रकारे लेखनमाध्यमातून व्यक्त होते. तीनुसार निकष ठरतात असा दलित साहित्यिकांचा दृष्टिकोन आहे.

दलित साहित्यिक हे सूर्यकुलाचे उपासक आहेत. हा नवा आदित्य समतेचा पुरस्कार करणारा आहे. ज्ञानाची कवाडे सर्वांसाठी खुली करणारा आहे. गरिबीचे दुःख नाहीसे करणारा आहे. तो प्रकाशमान होत असताना दलित साहित्यिक स्वस्थ बसू इच्छित नाही. तो कृतिप्रवण आहे आणि सृजनशील आहे. म्हणून त्याच्या सृजनशीलतेला धारदारपणा आहे.

दलित साहित्यिक प्रथमतः आत्मचरित्र, कविता आणि कथा या वाङ्मयप्रकारांकडे वळले. लेखनाच्या आरंभी साहित्यातील कवितेसारखा आत्मनिष्ठ प्रकार हाताळणे अपरिहार्य होते. त्यांचे काव्य हा त्यांच्या आजवर दबलेल्या आत्म्याचा हुंकार आहे. तो उत्स्फूर्त आहे. ललित लेखकांची आत्मकथने हा प्रांजळ जीवनानुभवाचा आदर्श नमुना आहे. त्यातील दाहकता संवेदनशील मनाला अंतर्मुख करणारी आहे. दलित कथेत सामूहिक दुःखव्यथांचे जसे चित्रण आहे तसेच वैयक्तिक दुःखानुभूतीचे उत्कट उद्गार आहेत.

दलित कवितेचा विचार करताना प्रा. केशव मेश्राम (उत्खनन), नामदेव ढसाळ (गोलपिठा), प्रा. यशवंत मनोहर (उत्थानगुंफा), दया पवार (कोंडवाडा), नरेशकुमार (अंगारा), त्र्यंबक सपकाळे (सुरुंग), चोखा कांबळे (पिंपळपान), प्रल्हाद

चेंदवणकर (ऑडिट), ज. वि. पवार (नाकेबंदी), अर्जुन डांगळे (छावणी हलते आहे), वामन निंबाळकर (गावकुसाबाहेरील कविता) आणि प्रा. फ. मु. शिंदे (जुलुस, नामांतर) यांच्या कवितांचा संदर्भ लक्षात घ्यायला हवा. त्याचबरोबर हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, बापूराव जगताप, भीमसेन देठे, सुखराम हिवराळे, राम दुतोंडे, डॉ. शशिकांत लोखंडे, बाबुराव गायकवाड, प्रकाश जाधव, बी. रंगराव व शांताराम हिवराळे यांचीही कविता विचारात घ्यायला हवी.

दलित कवितेची प्रकृती पाहता 'दुःख' हा स्थायी भाव तीत दिसून येतो. हे दुःख मानवनिर्मित आहे पण दुःखाने ही मने पिचलेली नाहीत. या दुःखाने त्यांना जगण्याची शक्ती दिलेली आहे. आत्मविश्वास जागा केलेला आहे. वैचरिक बंडखोरी दिलेली आहे. सामाजिक विसंवादावर कठोरपणे शरसंधान करताना दलित कवी अभिव्यक्तीचे जुने संकेत झुगारून देतात. सर्व साचे आंतरिक भावकल्लोळ व्यक्त करताना मोडले जातात. दबलेल्या भावभावनांचे तसेच विद्रोहाचे प्रातिनिधिक चित्रण ही कविता करते, त्यामुळे तिला आत्मबल प्राप्त झालेले आहे, पण दुःखव्यथा सांगण्याच्या एकसुरीपणामुळे तिला काही मर्यादाही पडलेल्या आहेत. ठराविक आवर्तात ती घुटमळत आहे.

''मध्यमवर्गाने जोपासलेल्या संस्कृतीला विरूपतेने ग्रासलेले आहे. अशी मोडकळीस आलेली संस्कृती आणि तिचे साहित्य तळागाळातील माणसाला कसे ओळखीचे वाटावे ?'' असे डॉ. म. ना. वानखेडे विचारतात. प्रस्थापितांच्या समाजव्यवस्थेवर दलित लेखकांनी कठोर टीका केलेली आहे. दगडू मारूती पवार यांच्या वाट्याला आलेले दुःखाचे बलुते भारतीय समाजव्यवस्थेने दिलेले आहे. स्वतःच्या आयुष्यातील खडतर वाटचालीचा हृदयविदारक आलेख दया पवारांनी 'बलुतं'मध्ये रेखाटलेला आहे. असेच खडतर अनुभव 'आठवणीचे पक्षी'मध्ये प्र. ई. सोनकांबळे यांनी प्रांजळपणे मांडलेले आहेत. ''जे भोगलं, जे जगलो, अनुभवलं, पाहिलं, ते ते तसंच लिहीत गेला'' असे लक्ष्मण माने 'उपरा' मध्ये सांगतात. 'काट्यावरची पोटं'मध्ये उत्तम बंडू तुपे म्हणतात, ''कुठंतरी कुणाला तरी ते काळीज फाडून पार इस्कटून दाखवावं'' 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे'मध्ये माधव कोंडविलकर दैनंदिनीचा आकृतिबंध स्वीकारून जीवनातील बऱ्यावाईट घटनांचा मागोवा घेतात. त्यांना विषमतेचे, जातीयतेचे चटके सहन करावे लागलेले आहेत. पण या कटुतेचा ओरखडा त्यांनी आपल्या मनावर उमटू दिलेला नाही. सहृदय साहित्यिकांच्या सहानुभूतीचे सुखद अनुभवही त्यांना आलेले आहेत. पारदर्शकता हा या आत्मकथनाचा विशेष आहे. 'तराळ अंतराळ' मधून 'शंकरराव खरातांना आपल्याच जीवनाची कथा सांगायची नाही तर आपल्या असंख्या बांधवांची दुःखव्यथा मांडायची आहे. 'आभरान' मध्ये पार्थ पोळके म्हणतात, ''गतकाळातील वेदना वा दुःखे उगाळून जगू इच्छित नाही. पण हे आमच्याच वाट्याला का याचा

जाब विचारावासा वाटतो. 'अंतःस्फोट'मध्ये कुमुद पावडे म्हणतात, ''विवेकबुद्धी जागृत ठेवणारी मी एक माणूस आहे.'' 'अक्करमाशी'मध्ये लिंबाळे यांचा मूलभूत प्रश्न आहे. ''मी कोण आहे ? गाव, भाषा, आई, वडील, जात, धर्म या सर्वच बाबतीत दुभंगलेला !'' 'कार्यकर्ता'मध्ये मुरलीधर जाधव कार्यकर्त्यांची मानसिकता, आशा-आकांक्षा उलगडून दाखवितात. 'गावकी'मध्ये रुस्तुम अचलखांब 'स्व'चा शोध घेतात. आत्मविश्लेषण करतात.

या साऱ्या आत्मकथनांतून दलित लेखकांनी स्वतःच्या यातनामय जीवनाचे अंतःस्तर उलगडून दाखविले आहेत. त्यातील जीवनानुभवाला भिडण्याची धिटाई, त्याचे तपमान कायम ठेवून तो मांडण्याची धिटाई लक्षणीय वाटते. जीवन त्यांनी भोगलेले आहे म्हणून त्यांना ते कळलेले आहे. जीवनाच्या समग्रतेचे भान व चिंतनाची प्रगल्भता नसेल तर लेखनाला कणाच राहत नाही. ही आशयसंपन्नता दलित आत्मकथनांनी मराठी साहित्याला दिली.

प्रा. केशव मेश्राम यांच्या 'हकीकत' व 'जटायू' या दोन लघुकादंबऱ्या रुढार्थाने कादंबरीचा आकृतिबंध घेऊन आलेल्या असल्या तरी 'हकीकत'मध्ये केशव मेश्रामांनी 'स्व'कडे अलिप्त व कलात्मक नजरेने पाहिले आहे. त्यातील 'अभिमन'ची व्यथा या दृष्टिकोनातून पाहायला हवी.

दलित कथेचा विचार करताना अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात आणि बंधुमाधव यांच्या सामाजिक व्यथांचे चित्रण करणाऱ्या कथांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. अण्णाभाऊ साठे यांनी 'खुळंवाडी' 'बरबाद्या कंजारी', 'भानामती', 'लाडी', 'फरारी' व 'गजाआड' इ. कथासंग्रह लिहिले. आर्थिक विषमता व जातीयता यामुळे त्यांचे संवेदनशील मन मार्क्सवादाकडे वळले. त्यातून त्यांना लेखनाची प्रेरणा मिळाली. पुढे ते डॉ. आंबेडकरांच्या विचारांनी प्रभावित झाले. दलितांच्या जीवनातील दैन्य, दारिद्र्य, लाचारी व विद्रोह हे सारे अण्णा भाऊंनी अतिशय प्रत्ययकारी स्वरुपात रेखाटलेले आहे. शंकरराव खरातांनी तळागाळातील समाजाच्या व्यथा वेशीवर टांगल्या. ते जीवन त्यांनी अनेक प्रसंगांतील बारकाव्यांनिशी जिवंत व्यक्तिचित्रांच्या सहाय्याने आणि कलात्मकतेने रंगविले. त्यांची कथा वाचताना संपूर्ण चित्रमालिका डोळ्यांपुढून संथपणे सरकत जाते. 'सांगावा', 'बारा बलुतेदार', 'दौंडी', 'टिटवीचा फेरा' 'तडीपार, 'सुटका', 'आडगावचं पाणी', 'गावशीव', 'मुलाखत', इ. कथासंग्रहांतून त्यांनी बारा बलुतेदार, गावकुसाबाहेरील दलित व भटक्या जमाती यांच्या जीवनाचे जे चित्रण केलेले आहे ते अंतर्मुख करणारे आहे.

बाबुराव बागुलांच्या कथा म्हणजे अनुभवाचा गाभाच. वाचकाला सुन्न

करणारा. 'जेव्हा मी जात चोरली होती' आणि 'मरण स्वस्त होत आहे' या कथासंग्रहांतून माणुसकीचे हक्क हिरावून घेणाऱ्या समाजव्यवस्थेच्या विरोधात असणारे मनस्वी नायक त्यांनी चित्रित केले. बागूलांच्या कथेतील निवेदन स्फोटक आहे. बंड व नकार यांना पेलणारी सकस व सतेज शब्दकळा हे त्यांच्या कथा लेखनाचे दुसरे वैशिष्ट्य, सामाजिक बांधिलकीचे व्रत अंगीकारून ते लेखन करताना दिसतात.

दलित रंगभूमी आणि दलित लेखकांनी केलेली दलित साहित्याची समीक्षा या बाबी दलित साहित्याच्या प्रेरणेशी निगडित आहेत. तरी त्यांचा विचार स्वतंत्रपणे करायला हवा.

दलित साहित्याच्या या वाटचालीत प्रा. गंगाधर पानतावणे यानी चालविलेल्या 'अस्मितादर्श' या वाङ्मयीन नियतकालिकाचे कार्य फार मोलाचे आहे. दलितांचे वैचारिक व सृजनात्मक असे ते व्यासपीठ आहे. दलित संवेदना जपण्याचे कार्य सातत्याने 'अस्मितादर्श' करीत आलेले आहे.

▲▲